**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रोजगार मेळाव्यात ५१ हजार युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप
- आंध्र प्रदेशात बस अपघातात २०जणांचा मृत्यू
- जाहिरात क्षेत्रातले दिग्गज पियुष पांडे यांचं निधन
- शेअर बाजारात तेजीला लगाम, सेन्सेक्समधे ३४५ अंकांची घसरण

**आणि**

- आशियायी युवा क्रीडा स्पर्धेत भारताच्या मुली आणि मुलांच्या कबड्डी संघांनी पटकावलं सुवर्ण पदक, तर मुलींच्या १०० मीटर अडथळ्यांच्या स्पर्धेत ठाण्याच्या शौर्या अंबुरेला रौप्य पदक

**<><><><><>**

देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीतल्या सतराव्या रोजगार मेळाव्याला व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून संबोधित करत होते. या रोजगार मेळाव्यात वेगवेगळ्या सरकारी खात्यांमध्ये पदं मिळालेल्या ५१ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्रं देण्यात आली.  रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत ११ लाख नियुक्त्या केल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड प्रधानमंत्री बाइट (२७ सेकंद)**

या मेळ्याचा भाग म्हणून मुंबईत झालेल्या कार्यक्रमात मंत्री आशिष शेलार, मंगलप्रभात लोढा आणि महाराष्ट्र गोवा सर्कलचे पोस्ट मास्टर जनरल अमिताभ सिंह यांच्या हस्ते ८० उमेदवारांना नियुक्तीपत्रं दिली गेली.

नागपूर इथं आयोजित कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २५ उमेदवारांना प्रातिनिधिक स्वरूपात, तर एकूण ११३ जणांना नियुक्तीपत्रं दिली गेली.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशमध्ये कुर्नुल इथे आज पहाटे खाजगी प्रवासी बसला लागलेल्या आगीत २० जणांचा मृत्यू झाला. हैदराबादहून बंगळुरूला जाणारी ही खाजगी बस दुचाकीला धडकल्यानंतर तिनं पेट घेतला. बसचा दरवाजा उघडता न आल्यानं प्रवाशी बाहेर पडू शकले नाहीत.बसमध्ये ४१ प्रवासी होते, त्यातल्या २१ जणांना वाचवण्यात यश आलं असून त्यांना रुग्णालयात दाखल केलं आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री राष्ट्रीय मदतनिधीतून मृतांच्या कुटुंबियांना २ लाख रुपयांची  आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर झाली आहे. आंध्र प्रदेश आणि तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून, आंध्र प्रदेश सरकारनं मृतांच्या कुटुंबियांना ५ लाख रुपयांची  आणि जखमींना २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महिलांचा पूर्ण सहभाग असणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. केरळच्या एर्नाकुलम इथल्या सेंट तेरेसा महाविद्यालयाच्या शताब्दीपूर्ती समारंभात त्या आज बोलत होत्या. महिला शिक्षणाच्या क्षेत्रात गेली अनेक दशकं कार्यरत असलेल्या सेंट तेरेसा संस्थेबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. याच समारंभात संस्थेच्या शताब्दीनिमित्त एका विशेष बोधचिन्हाचं त्यांनी अनावरण केलं.

**<><><><><>**

कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दरात शेतमाल विकू नये, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. मुंबईत वार्ताहरांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध यंत्रणांच्या माध्यमातून खरेदी केंद्राचं जाळं निर्माण केलं आहे. या केंद्रांवर शेतकऱ्यांचा संपूर्ण माल खरेदी केला जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><><>

ऑपरेशन सिंदूर हे भारतीय सैन्याचं कौशल्य आणि राष्ट्रीय चरित्राचं प्रतीक आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज राजस्थानमधे जयपूर इथं लष्करी कमांडरांच्या बैठकीत सीमा सुरक्षा स्थितीचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. शत्रूला कधीही कमी समजू नका, आणि सतर्क, सज्ज रहा, असं आवाहन त्यांनी सेना दलांना केलं. या बैठकीत सैन्यदल प्रमुख जनरल अनिल चौहान यांच्यासह अनेक उच्चपदस्थ लष्करी अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी राजनाथ सिंह यांनी नमन केंद्र, सैनिक यात्री मित्र ॲप तसंच उपकरण हेल्पलाईन ॲपचं उद्घाटन केलं.

<><><><><>

अमेरिकेनं रशियाच्या दोन सर्वात मोठ्या तेल कंपन्यांवर लादलेले ताजे निर्बंध म्हणजे रशियावर दबाव टाकण्याचा प्रयत्न आहे, मात्र या निर्बंधांचा रशियाच्या अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम होणार नाही असं रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी म्हटलं आहे. हे निर्बंध मित्रत्वात बाधा आणणारे असून, रशिया आणि अमेरिकेतील संबंधांमधल्या अलिकडच्या प्रगतीच्या दृष्टीनं ते योग्य नसल्याचंही त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

आधुनिक भारतीय जाहिरात क्षेत्राचे शिल्पकार पियुष पांडे यांचं मुंबईत निधन झालं. ते ७० वर्षांचे होते. गेले काही दिवस ते विषाणू संसर्गानं आजारी होते.

ऑगिल्व्ही या जाहिरात कंपनीचे कार्यकारी अध्यक्ष असलेले पांडे यांना २०१६ साली पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं होत.

भाजपाच्या 'अबकी बार मोदी सरकार' या जाहिरातीचे, तसंच पोलिओ लस अभियानाच्या 'दो बूंद जिंदगी के' या जाहिरातींचे ते जनक होते. कॅडबरी डेरी मिल्क, एशियन पेंट्स, वोडाफोन इत्यादी अनेक सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहिरातींच्या कल्पना त्यांनी यशस्वी केल्या होत्या.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करत त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

सलग ६ सत्रात असलेल्या तेजीला देशातल्या शेअर बाजारांनी आज विराम दिला. काल वर्षभरातल्या उच्चांकी पातळीला स्पर्श केलेल्या देशातल्या दोन्ही शेअर बाजारात आज घसरणीचं वातावरण होतं. सकाळपासून सुरू झालेली घसरण दुपारनंतर आणखी वाढली आणि सेन्सेक्स ३४५ अंकांची घट नोंदवून ८४ हजार २१२ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ९६ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ७९५ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी युवा क्रीडा स्पर्धांमध्ये १८ वर्षांखालच्या मुली आणि मुलांच्या भारतीय कबड्डी संघानं सुवर्ण पदक पटकावलं आहे. मुलींच्या संघानं इराणला ७५-२१ असं १२ वर्षातल्या सर्वात मोठ्या फरकानं नमवलं. मुलांच्या संघानं इराणला ३५-३२ असं हरवलं.

या स्पर्धेत मुलींच्या १०० मीटर अडथळ्यांच्या धावण्याच्या स्पर्धेत ठाण्याची शौर्या अंबुरे हिला रौप्य पदक मिळालं.

**<><><><><>**

भावी पिढ्या आरोग्यदायी असाव्यात यासाठी नैसर्गिक शेती करणं गरजेचं असल्याचं राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत राजभवनात मंत्रिमंडळ आणि विधानमंडळाच्या सदस्यांसाठी नैसर्गिक शेती या विषयावर आयोजित चर्चासत्राला मार्गदर्शन करताना बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या चर्चासत्रात मार्गदर्शन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जीवन प्रवासावर आधारित Modi's Mission या पुस्तकाचं या पुस्तकाचं प्रकाशन आज राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते मुंबईत राजभवनात झालं. प्रख्यात वकील बर्जिस देसाई यांनी हे पुस्तक लिहिलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यातल्या इस्लामपूर गावाचं नाव ईश्वरपूर करायला केंद्र सरकारची मंजुरी मिळाली आहे. यासंदर्भात राज्य सरकारनं केंद्राला प्रस्ताव पाठवला होता. आता ईश्वरपूर नगरपरिषद, ईश्वरपूर विधानसभा मतदारसंघ यांसह तालुका, जिल्हा अशा सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांवर हेच नाव वापरलं जाईल.

**//<><><><><>//**